# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक – पिन 422003, दुरध्वनी नंबर 0253–2309700

E.Mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in


---

## प्रेस नोट

दि.२६/०१/२०२२

### नाशिक ग्रामीण पोलीस दलाच्या नव्या संकेतस्थळाचे लोकार्पण

---

आज दिनांक २६/०१/२०२२ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण श्री.सचिन पाटील यांचे संकल्पनेतुन साकारण्यात आलेल्या नाशिक ग्रामीण पोलीस दलाच्या नव्या संकेत स्थळाचे लोकार्पण श्री.सचिन पाटील, पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांचे हस्ते करण्यात आले.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचे जुने संकेतस्थळ हे संगणकावरच ओपन करण्याप्रर्यंत मर्यादीत होते. परंतु नुतनीकरण केलेले https://www.nashikruralpolice.gov.in हे संकेतस्थळ आधुनिक तंत्रज्ञान वापरून तयार केल्याने ते मोबाईल, टॅब, आयपॅड यासारख्या उपकरणांमध्ये सहजपणे ओपन केले जावु शकते. तसेच त्यामध्ये सायबर सुरक्षेवर विशेष भर देण्यात आला आहे. नुतनीकरण केलेले संकेतस्थळ हे नागरीकांना सहज हाताळणे योग्य लोकाभिमूक बनविण्यात आलेले आहे.

यापुर्वीचे संकेतस्थळ इंग्रजी भाषेमध्ये तयार करण्यात आलेले होते, परंतु नुतनीकरण केलेले नवीन संकेतस्थळ हे इंग्रजी व मराठी भाषेत तयार करण्यात आलेले आहे. यात नागरीकांना तक्रार व गोपनीय माहिती देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच नव्या संकेतस्थळावर जिल्हा पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी आणि पोलीस ठाणे तसेच विविध कार्यालय यांचे अधिका-यांचे फोटो व संपर्क क्रमांक व नजदिकच्या पोलीस स्टेशन माहिती तात्काळ उपलब्ध होवुन शकणार आहे.

लॉस्ट ॲण्ड फाउंड (हरवलेले व सापडलेले) या टॅबवरून नागरीकांना अतिमहत्वाची वस्तु हरविल्यास किंवा सापडल्यास त्याबाबतची माहिती पोलीसांना तात्काळ घर बसल्या देता येणार आहे. तसेच सायबर क्राईमबाबतही ऑनलाईन तक्रार घर बसल्या देता येणार आहे.

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असल्याने व सर्व नागरीक मोबाईल व इंटरनेटचा मोठया प्रमाणात वापरकरीत असल्याने त्यांना त्याव्दारे नाशिक ग्रामीा पोलीस दलाचे संकेतस्थळ आवश्यक अशी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता सदर नुतनीकरण केलेले संकेतस्थळ निश्चीतच उपयोगी ठरणार असल्याने नागरीकांनी पोलीस कामकाजासाठी सदर संकेतस्थळाचा मोठया प्रमाणावर वापर करण्याचे आवाहन पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण श्री.सचिन पाटील यांनी केलेले आहे.